**दिनेश**
**बिल्डींग मटेरियल सप्लायर्स**
खडी, क्रेशन, वन फोर, डबर, वॉशटेन, मुरूम, वीट, सिमेंट ब्लॉक (सुट्ट सिमेंट मिळेल...)
मो. नं. 9271713368, 9860330587



दैनिक
# आकर्षण

संपादक : विजय सांगळे        सहसंपादक : तुकाराम कामठे



या गुढी पाडव्याला आपल्या घराला द्या नवीन आणि आधुनिक साज!

इंटेरिअर डिझायनर श्रेया निलाखे
घर, फ्लॅट व ऑफिससाठी आकर्षक आणि आधुनिक इंटेरिअर डिझाईन.



- आधुनिक व मिनिमल डिझाईन
- स्मार्ट स्पेस प्लॅनिंग
- बजेटमध्ये सुंदर इंटेरिअर सोल्युशन्स

संपर्क: 75-59-26-16-75



वर्ष ५ । अंक १८७ । सोमवार १३ एप्रिल २०२६ । पाने ४ । मूल्य ₹ २    https://epaper.dainkaakarshan.com    E-mail- dainikaakarshan@gmail.com    RNI NO. MAHMAR/2021/84322


# मतदार यादी पुनरीक्षण कामास नकार देण्याऱ्या नेवाशातील दोन शिक्षकांविरुध्द गुन्हा दाखल

## स्वत: तहसीलदारांनी दाखल केली फिर्याद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** नेवासा विधानसभा मतदार संघामध्ये विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रमांतर्गत (एसआयआर) मतदारयादींचे अद्यावतीकरण व मतदार मपिंगचे राष्ट्रीय कर्तव्य करण्यास नकार देणाऱ्या मतदान केंद्रस्तरीय अधिकाऱ्यासह (शिक्षक) एक शिक्षक अशा दोघांविरुधद पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विशेष म्हणजे या दोघांविरुध्द तहसीदांनी फिर्याद दिली आहे.

अंबादास रामराव जाधव, मेघराज नारायण तुंवर गुन्हा दाखल झालेल्या अशा दोन शिक्षकांची नावे आहे. याबाबत सविस्तर असे की, नेवासा विधानसभा विधानसभा मतदार संघामध्ये विशेष संक्षिप्त पुनरीक्षण कार्यक्रम (एसआयआर) अंतर्गत मतदार यादींचे अद्यावतीकरण व मतदार मपिंगचे अत्यंत महत्वाचे राष्ट्रीय कर्तव्य सुरु ओ. या कामासाठी कार्यालयामार्फत आदेश काढण्यात आला होता. नेवासा तालुक्यातील पिंपरीशहाली माध्यमिक विद्यालयातील अंबादास रामराव जाधव यांची नियक्ती मतदान केंद्र करण्यात आली होती. (बीएलओ), सोनई येथील माध्यमिक शिक्षणक आदर्श विद्यालयातील मेघराज नारायण तुंवर (एसआरआय) यांची मतदान केंद्रस्तरीय अधिकारी नियुक्ती करण्यता आली होती.

सदरच्या कामासाठी या दोनही कर्मचाऱ्यांना नोटिस बजावण्यात आल्या होत्या परंतु या दोघांनीही नोटिस स्विकारण्यास नकार दिला. त्यामुळे या दोघांबात महसुलच्या कर्मचाऱ्यांनी लेखी सविस्तर अहवाल तहसील कार्यालयाला सादर केला. त्यानुसार अंबादास रामवराव जाधव व मेघराज नारायण तुंवर या दोघांविरुध्द जाणीवपुर्वक आदेशाची अवहेलना करुन लोकप्रतिनिधी कायदा १९५० कलम ३२ (निवडणुक कर्तव्यास भंग) तसेच भारतीय न्याय संहिता कलम २२१ व १९८ नुसार ते शिक्षेस पात्र ठरतात असा ठपका ठेवून त्यांच्या विरुध्द तहसीलदार संजय पुंडलिक बीरादार यांच्या फिर्यादीवरुन गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# तडीपार कट्टा बाळगणारा तडीपार आरोपी जेरबंद



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** गावठी पिस्टल बाळगल्या प्रकरणी आरोपीस भिंगार कॅम्प पोलिसांनी जेरबंद केले आहे. आकाश संजय पवार (वय–२६, रा. ब्रम्हतळे नागरदेवळे, ता.जि. नगर) असे आरोपीचे नाव असून, त्याच्यावर तडीपारीची कारवाई झालेली आहे.


दि.१३ रोजी भिंगार कॅम्पचे सपोनि जगदीश मुलगीर यांना गोपनीय माहिती मिळाली की, बाराबाभळी शिवारात हॉटेलसमोर एक इसम कंबरेला गावठी कट्टा लावून संशयितरित्या फिरत आहे. त्यानुसार पथकाने नमूद ठिकाणी सापळा रचून आकाश पवार यास जेरबंद केले. त्याच्या कंबरेला एक गावठी बनावटीचे पिस्टल व दोन जिवंत काडतुसे मिळून आली.

दरम्यान, उपविभागीय दंडाधिकारी नगर भाग यांनी दिनाक १६ एप्रिल २०२४ पासून त्यास दोन वर्षांकरिता तडीपार केल्याचे उघड झाले असून, त्याच्यावर हद्दपार आदेशाचा भंग केल्य ाप्रकरणीही कॅम्प पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, अपर पोलीस अधीक्षक वैभव कलुबर्मे, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. दिलीप टिपरसे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि जगदीश मुलगीर, योगेश पवार, पोलीस अंमलदार विलास गारुडकर, रामनाथ डोळे, प्रमोद लहारे यांनी केली आहे.

# रांजणगाव गणपती मंदिर तीन महिन्यांसाठी बंद

## मंदिराची दुरुस्ती आणि सुशोभीकरण होणार




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिरूर–** अष्टविनायकापैकी एक असलेले रांजणगाव येथील महागणपती मंदिर सुशोभिकरण व दुरुस्तीच्या कामांमुळे काही कालावधीसाठी भाविकांसाठी बंद ठेवण्याचा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्रातील सात मंदिरांच्या विकास आराखड्याअंतर्गत हा प्रकल्प राबविण्यात येत आहे.

विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील उच्चस्तरीय समिती तसेच जिल्हास्तरीय समितीच्या मान्यतेनंतर पुरातत्व विभागाकडून मंदिराच्या मुख्य गाभाऱ्याची संरचना, सभामंडप, तसेच परिसरातील पायाभूत सुविधांची दुरुस्ती व सुशोभीकरणाचे काम हाती घेतले जाणार आहे. या अनुषंगाने मंदिर काही काळासाठी पूर्णतः बंद ठेवण्याची विनंती करण्यात आली होती. या प्रस्तावाला संबंधित प्रशासन, देवस्थान ट्रस्ट आणि ग्रामसभेची मान्यता मिळाली आहे.

त्याअनुषंगाने, १५ एप्रिल २०२६ पासून ३१ जुलै २०२६ पर्यंत मंदिर भाविकांसाठी पूर्णतः बंद राहणार आहे. या कालावधीत मंदिरातील नित्यपूजा, धार्मिक विधी आणि परंपरागत सेवा नियमितपणे सुरू राहतील, मात्र कोणत्याही भाविकांना मंदिर परिसरात प्रवेश दिला जाणार नाही. भाविकांची गैरसोय टाळण्यासाठी प्रशासनाकडून विशेष उपाययोजना करण्यात येत असून, मंदिराबाहेरील ठिकाणी एलईडी स्क्रीनद्वारे थेट दर्शनाची सुविधा उपलब्ध करून दिली जाणार आहे. त्यामुळे दूरवरून येणाऱ्या भाविकांना किमान दर्शनाची सोय मिळणार आहे. सुरक्षेच्या दृष्टीने, मंदिर परिसरात मोठ्या प्रमाणावर काम सुरू असणार असल्यामुळे, संवेदनशील भागांमध्ये सुरक्षा उपाय उभारण्यात येणार आहेत. कामाच्या ठिकाणी अनधिकृत प्रवेश पूर्णतः बंद ठेवण्यात येणार असून, प्रशासनाकडून विशेष देखरेख ठेवली जाणार आहे. तीन महिन्यांच्या कालावधीत मुख्य दुरुस्तीची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असून, ३१ जुलै २०२६ रोजी मंदिर पुन्हा भाविकांसाठी खुले करण्यात येणार आहे. त्यानंतर उर्वरित किरकोळ कामे टप्प्याटप्प्याने सुरू राहतील. यावेळी प्रशासन, देवस्थान ट्रस्ट आणि रांजणगाव गणपती ग्रामस्थ या बैठकीला उपस्थित होते.

# सराईतांच्या टोळीकडून १२ मोटारसायकली हस्तगत

## एलसीबीच्या कारवाईने सात गुन्हे उघडकीस



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** मढी यात्रेसह इतर ठिकाणाहून दुचाकींची चोरी करणारी सराईत चारजणांची टोळी जेरबंद करण्यात स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला यश आले आहे. या टोळीच्या अटकेने सात गुन्हे उघडकीस आले असून, महेश मारुती कांदळकर (वय–२४ वर्षे रा. जाधववस्ती, अशोकनगर, ता. श्रीरामपूर), अजय रेवजी कांदळकर (वय २२ वर्षे, रा. जाधववस्ती, अशोकनगर, ता. श्रीरामपूर), जावेद समद वेग (वय १८ वर्षे, रा. अशोकनगर, निपाणी वडगाव रोड, ता. श्रीरामपूर) व विकास बाळासाहेब जाधव (वय–१९ वर्षे, रा. जाधववस्ती, अशोकनगर ता. श्रीरामपूर) अशी अटकेतील आरोपींची नावे आहेत. ■ पान ४ वर


### पथकात यांचा सहभाग

**सदरची कारवाई पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे वरील पोलीस निरीक्षक किरणकुमार कबाडी तसेच तपास पथकातील सपोनि हरीश भोये, पोसई संदीप मुरकुटे व पोलीस अंमलदार दीपक घाटकर, सुरेश माळी, अतुल लोटके, विष्णू भागवत, फुरकान शेख, बाळासाहेब नागरगोजे, रिचर्ड गायकवाड, रमिजराजा आतार, विशाल तनपुरे, प्रशांत राठोड, अमृत आढाव, बाळासाहेब गुंजाळ, भगवान थोरात, योगेश कर्डिले. प्रकाश मांडगे, महिला पोलीस अंमलदार सोनल भागवत, चालक भगवान धुळे, अरुण मोरे यांच्या पथकाने केली.**

# राहुरी पोटनिवडणुकीसाठी २३ एप्रिलला सार्वजनिक सुट्टी

## शासकीय, निमशासकीय व खासगी आस्थापनांनाही लागू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राहुरी विधानसभा मतदारसंघातील पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मतदानाच्या दिवशी गुरुवार, दि. २३ एप्रिल २०२६ रोजी सार्वजनिक सुट्टी जाहीर करण्यात आली आहे. राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाने यासंदर्भातील अधिसूचना प्रसिद्ध केली असून, या निर्णयामुळे मतदारांना मतदानासाठी अधिक सुलभता निर्माण होणार आहे.

जाहीर करण्यात आलेली ही सुट्टी केवळ मतदारसंघापुरती मर्यादित नसून, त्या मतदारसंघात नोंद असलेल्या आणि कामानिमित्त इतर ठिकाणी वास्तव्यास असलेल्या मतदारांनाही लागू राहणार आहे. त्यामुळे बाहेरगावी असलेल्या नागरिकांनाही आपल्या मतदानाच्या हक्काचा वापर करण्यासाठी संधी उपलब्ध होणार आहे.

शासनाच्या आदेशानुसार, ही सुट्टी राज्य व केंद्र शासनाच्या सर्व कार्यालयांबरोबरच निमशासकीय कार्यालये, सार्वजनिक उपक्रम तसेच विविध खासगी आस्थापनांनाही लागू राहणार आहे. निवडणूक प्रक्रियेत अधिकाधिक नागरिकांचा सहभाग वाढावा आणि लोकशाहीचा मूलभूत हक्क बजावण्यास कोणतीही अडचण येऊ नये, या उद्देशाने हा निर्णय घेण्यात आला आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहन देण्यावर भर देण्यात येत असून, राहुरी मतदारसंघात शांततापूर्ण व उत्साही वातावरणात मतदान पार पडावे, यासाठी आवश्यक तयारी सुरू असल्याचेही स्पष्ट करण्यात आले आहे.

# नवीन रस्त्यांवर गॅस पाईपलाईन कंपनीकडून खोदकाम; नागरिकांमध्ये संताप

## बांधकाम विभागाचे दुर्लक्ष उघड; नव्या रस्त्यांवर पुन्हा खड्डे । कारवाईची नागरिकांची मागणी; प्रशासनाने नियोजनबद्ध काम करण्याची गरज



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शहरातून जाणाऱ्या मनमाड राज्य महामार्गाचे डांबरीकरण व रुंदीकरणाचे काम नुकतेच पूर्ण झाले असून, अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लागल्याने शहराला सुशोभीकरणाचे रूप प्राप्त झाले होते. या रस्त्यावरून मोठ्या प्रमाणात वाहतूक होत असल्याने नागरिकांना मोठा दिलासा मिळाला होता.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील व शहराचे आमदार संग्राम जगताप यांच्या प्रयत्नातून या कामासाठी शासनाकडून मोठा निधी उपलब्ध झाला होता. मात्र, नव्याने तयार झालेल्या रस्त्यावर गॅस पाईपलाईन कंपनीकडून ठिकठिकाणी खोदकाम करण्यात येत असून मोठमोठे खड्डे तयार झाले आहेत. त्यामुळे नव्या रस्त्यांची पुन्हा दुरवस्था होत असल्याने नागरिकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या संपूर्ण प्रकाराकडे सार्वजनिक बांधकाम विभागाने अक्षरशः डोळेझाक केल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. ''शहरात प्रशासन आहे की नाही?'' असा सवालही नागरिक उपस्थित करत आहेत. नव्याने झालेल्या रस्त्यांवर अशा प्रकारे खोदकाम होणे ही गंभीर बाब असून, यामुळे अपघातांचा धोका वाढण्याची शक्यता आहे.

गॅस पाईपलाईन कंपनीवर तात्काळ कारवाई करण्यात यावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे. आमदार संग्राम जगताप यांच्या माध्यमातून शहरात सुरू ■ पान ४ वर

# मनपा क्रिकेट स्पर्धा उत्साहात; घनकचरा विभाग विजेता

## प्रभाग समिती क्रमांक दोन उपविजेता; अटीतटीच्या सामन्यांनी रंगली स्पर्धा । अधिकारी–कर्मचाऱ्यांनी दाखवली सांघिकतेची भावना; खेळाचा घेतला मनसोक्त आनंद

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** महानगरपालिकेच्या वतीने पदाधिकारी, अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी आयोजित क्रिकेट स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडली. या स्पर्धेत एकूण १२ संघांनी सहभाग नोंदवला होता. सर्व सामन्यांमध्ये अटीतटीची लढत पाहायला मिळाली आणि खेळाडूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत प्रेक्षकांची मने जिंकली.

या स्पर्धेत पदाधिकारी, स्थायी समिती सभापती सुभाष लोंढे, प्रशासकीय कार्यालय 'अ' (आयुक्त यशवंत डांगे), प्रशासकीय कार्यालय 'ब' (उपायुक्त मेहेर लहारे), प्रभाग समिती कार्यालय एक (राहुल साबळे), प्रभाग समिती कार्यालय दोन (अमोल बोजा), प्रभाग समिती कार्यालय तीन (श्याम शिंदे), प्रभाग समिती कार्यालय चार (हबीब शेख), शिक्षण विभाग (अक्षय शिंदे), घनकचरा विभाग (शुभम उपलची), आरोग्य विभाग (डॉ. सतीश राजुरकर) आदी संघांनी सहभाग घेतला.

स्पर्धेतील उपांत्य फेरीत प्रभाग समिती कार्यालय दोन व तीन यांच्यात अटीतटीची लढत झाली, ज्यामध्ये प्रभाग समिती कार्यालय दोनने अंतिम फेरीत प्रवेश मिळवला. दुसऱ्या उपांत्य फेरीत प्रशासकीय कार्यालय 'ब' व घनकचरा विभाग यांच्यात रोमांचक सामना रंगला, ज्यात घनकचरा विभागाने विजय मिळवत फायनलमध्ये धडक मारली.

अंतिम सामना घनकचरा विभाग व प्रभाग समिती कार्यालय क्रमांक दोन यांच्यात रंगला. या सामन्यात उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करत घनकचरा विभागाने विजेतेपद पटकावले, तर प्रभाग समिती क्रमांक दोन संघ उपविजेता ठरला.

या स्पर्धेमध्ये अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सांघिकतेची भावना जपत खेळाचा मनसोक्त आनंद घेतला. कामाच्या ताणतणावातून बाहेर पडत क्रीडांगणावर सर्वांनी उत्साहाने सहभाग घेतला आणि आपल्या कलागुणांना वाव दिला.

क्रीडा अधिकारी व्हिन्सेंट फिलिप्स यांनी स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल सर्व खेळाडू व सहभागींचे आभार मानले.

## दै. आकर्षण निवडक

### कास्ट्राईब महासंघाच्या राज्य उपाध्यक्षपदी पोपट खंडागळे यांची नियुक्ती


अहिल्यानगर - महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी



कल्याण महासंघाच्या राज्य उपाध्यक्षपदी सेवानिवृत्त कार्यकारी अभियंता पोपट खंडागळे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. महासंघाचे राज्य अध्यक्ष एन. एम. पवळे यांनी खंडागळे यांना नियुक्तीपत्र देऊन त्यांचा सत्कार केला. पोपट खंडागळे यांनी कास्ट्राईब महासंघाच्या जिल्हा उपाध्यक्षपदावर तब्बल २५ वर्षे जबाबदारी सांभाळली आहे. या काळात त्यांनी कर्मचारी हिताच्या विविध प्रश्नांवर सातत्याने आवाज उठवला. शासन दरबारी प्रलंबित असलेल्या अनेक मुद्द्यांवर पाठपुरावा करून त्यांनी कर्मचाऱ्यांना न्याय मिळवून दिला. खंडागळे यांनी सार्वजनिक बांधकाम विभाग, जिल्हा परिषद येथे कार्यकारी अभियंता या महत्त्वाच्या पदावर कार्य करताना विविध विकासकामांमध्ये आपला ठसा उमटवला आहे. त्यांच्या कार्यकाळात अनेक पायाभूत सुविधा प्रकल्पांची यशस्वी अंमलबजावणी झाली. ते सारनाथ गृहनिर्माण सहकारी संस्थेचे संस्थापक सदस्य असून, विविध सामाजिक उपक्रमांमध्ये त्यांचा सक्रिय सहभाग असतो. कर्मचारी संघटनांबरोबरच सामाजिक चळवळींमध्येही त्यांनी नेतृत्वाची भूमिका निभावली आहे. समाजातील वंचित घटकांसाठी त्यांचे सातत्याने कार्य सुरु आहे. एन.एम. पवळे यांनी ''खंडागळे यांचा दीर्घ अनुभव आणि कर्मचारी हितासाठीची तळमळ महासंघाच्या कार्याला नवी दिशा देईल. त्यांच्या नेतृत्वाखाली राज्यातील कर्मचारी प्रश्न अधिक प्रभावीपणे मांडले जातील, असा विश्वास व्यक्त केला. या निवडीबद्दल वसंत थोरात, के. के. जाधव, निवृत्ती धांडोरे, समीर वाघमारे, श्याम थोरात आदी पदाधिकाऱ्यांनी खंडागळे यांचे अभिनंदन केले. राज्य उपाध्यक्षपदी झालेली निवड ही त्यांच्या दीर्घकालीन सेवाभावी कार्याचा गौरव असून, कर्मचारी चळवळीला नवी ऊर्जा देणारी ठरणार असल्याचा विश्वास उपस्थित पदाधिकाऱ्यांनी व्यक्त केला.

### शहर वाहतूक विभागाचा कारभार विस्कळीत झाल्याचा आरोप

अहिल्यानगर- शहरातील वाहतूक व्यवस्थेबाबत



गंभीर आरोप करण्यात आले आहे. शहर वाहतूक विभागाचा कारभार सध्या पूर्णपणे विस्कळीत झाल्याचा आरोप अखिल भारतीय सह्याद्री छावा संघटनेच्या वतीने करण्यात आला आहे. या संदर्भात मुख्यमंत्री तथा गृहमंत्री देवेंद्र फडणवीस आणि विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक विभाग यांना तक्रारीचे निवेदन प्रदेश कार्याध्यक्ष रावसाहेब काळे यांनी पाठवले आहे. संघटनेच्या म्हणण्यानुसार, शहर वाहतूक विभागाच्या आशिर्वादाने खासगी वाहतुकीला खुलेआम मोकळीक दिली जात आहे. हप्ते वसुलीचा प्रकार जोरात सुरू असून, काही मर्जीतील कर्मचाऱ्यांना महत्त्वाचे पॉइंट देण्यात येत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. तसेच, हप्तेखोर एजंटांचा वाहतूक विभागाच्या कार्यालयात वारंवार वावर असल्याचेही निदर्शनास आणले गेले आहे. कार्यालयातील सीसीटीव्ही फुटेजची खातेनिहाय चौकशी करण्यात यावी, अशी मागणी संघटनेने केली असून, अन्यथा १७ एप्रिल रोजी विशेष पोलीस महानिरीक्षक, नाशिक यांच्या दालनात अर्धनग्न आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला आहे. संघटनेच्या तक्रारीनुसार, शहरात अवजड वाहनांमुळे अपघातांची संख्या वाढली आहे. टिळक रोडवर विना नंबरच्या डंपरने एका शिक्षकाचा मृत्यू झाल्याची घटना अद्यापही अनुत्तरित आहे. तसेच बालिकाश्रम रोडवरील बालकाचा मृत्यू, पत्रकार चौकातील अपघात अशा अनेक घटनांचा उल्लेख करण्यात आला आहे. शहरात अवजड वाहतूक बंदी असतानाही ही वाहने बिनधास्तपणे शहरात येत असल्याने नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. शेंडी बायपास आणि केडगाव बायपासवर पोलीस तैनात असूनही ही वाहने शहरात कशी प्रवेश करतात, असा सवाल उपस्थित करण्यात आला आहे.पुणे बस स्थानक परिसरात खासगी वाहनांचे एजंट खुलेआम प्रवाशांना आकर्षित करून वाहनात बसवत असल्याचा आरोप करण्यात आला आहे. शहरात अपघात होत असताना वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी नेमके काय करत आहेत, असा संतप्त सवाल संघटनेने उपस्थित केला आहे.

## विश्व हिंदू परिषद, अहिल्यानगर तर्फे महात्मा ज्योतिबा फुले यांना अभिवादन



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** क्रांतीसुर्य महात्मा जोतीराव फुले भारताचे थोर सुपुत्र, विचारवंत, समाजसुधारक यांची जयंती सर्वत्र उत्साहात साजरी करण्यात आली आहे.

२३ सप्टेंबर १८७३ रोजी महात्मा फ ले यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना केली. सर्वसामान्य लोकांवर होणारा अन्याय अत्याचार दूर करणे तसेच गुलामगिरीतून समाजाची मुक्तता करणे व त्यांना त्यांच्या हक्काची जागीच करुन देणे हे सत्यशोधक समाजाचे ध्येय होते.महात्मा फुले यांनी एका कवितेत शिक्षणाचे महत्व पटवून देताना म्हटले आहे की,

विद्येविना मती गेली। मतिविना नीती गेली। नितीविना गती गेली। गतिविना वित्त गेले । वित्ताविना शुद्र खचले । इतके अनर्थ एका अविद्येने कैले ।।एक महिला शिकली तर संपूर्ण कुटुंब शिकते. समाज शिक्षित

असेल आणि बहुजन समाजात शिक्षण मुहूर्त मेढ रोवयची असेल तर महिलांना शिक्षित व्हायलाच हवे.असे महात्मा फुले यांचे विचार समाजासाठी प्रेरणादायी आहे.असे प्रतिपादन विहिंप चे जिल्हासह मंत्री राजेंद्र चुंबळकर यांनी केले आहे.

माळीवाडा येथे विश्व हिंदू परिषदेतर्फे महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी विश्व हिंदू परिषद,बजरंग दल अहिल्यानगर जिल्हासह मंत्री राजेंद्र चुंबळकर, जिल्हा प्रसिद्धीप्रमुख अमोल भांबरकर,सोमनाथ चितळकर ,वीरेंद्र शिंदे,दिनेश हिरगुडे,शुभम शिंदे,रोहन चावरे, चंद्रकांत पुंड, सुधीर पुंड आदी उपस्थित होते.

## पोलीस प्रशासन आयोजित चित्रकला स्पर्धेत सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूलच्या विद्यार्थ्यांची उत्तुंग भरारी



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** आजचे विदयार्थी आणि भविष्यातील भारताचे सुजान नागरीक असणाऱ्या विदयार्थ्यांना आजच्या सामाजिक समस्या व त्यावरील उपाय याबाबत जागरुकता निर्माण व्हावी. याकरीता जिल्हा पोलीस निर्भया पथक, अहिल्यानगर शहर उपविभाग जागतिक महिला दिना निमित्त भव्य चित्रकला व पोस्टर स्पर्धा आयोजित करण्यात आली होती. या स्पर्धेचे बक्षीस वितरण पोलीस अधीक्षक श्री. सोमनाथ घार्गे आणि उपविभागीय पोलीस अधिकारी श्री दिलीप टिपरसे यांच्या उपस्थितीत संपन्न झाला.

या स्पर्धेमध्ये सेंट विवेकानंद इंग्लिश स्कूल मधील विद्यार्थ्यांनी माध्यमिक विभागाच्या प्राचार्य गीता तांबे. तसेच प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका सौ. कांचन पापडेजा यांच्या मार्गदर्शनाखाली घवघवीत यश संपादन केले.

गट क्र.१उत्तेजनार्थ अंगद प्रभाकर भावले मायरा रोहित वैरागर गट क्र.२ उत्तेजनार्थ पूजा योगेश ताटी प्रणिल अमोल ठिगळे गट क्रं.३ प्रथम क्रमांक अपूर्वा सागर नांदुरकर या विद्यार्थ्यांच्या यशस्वीतेसाठी श्री. मनीष लांडे सौ. अनामिका म्हस्के यांनी परिश्रम घेतले.

या प्रसंगी संस्थेचे अध्यक्ष श्री. राम मेंघानी, उपाध्यक्ष श्री. रूपचंद मोटवानी, सचिव श्री. गोपाल भागवानी, खजिनदार श्री. दामोधर माखिजा, विश्वस्त श्री. महेश मध्यान, श्री. सुरेश हिरानंदानी, श्री. राजकुमार गुरुनानी, श्री. हरेष मध्यान तसेच प्राचार्या गीता तांबे व मुख्याध्यापिका सौ कांचन पापडेजा यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

## अहिल्यानगरात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विद्यानगर येथे मोफत आरोग्य शिबिर

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त विद्यानगर येथे नागरिकांसाठी मोफत सर्वरोग निदान, आरोग्य तपासणी शिबिर व औषध वाटपाचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमामुळे सर्वसामान्य नागरिकांना तज्ज्ञ डॉक्टरांकडून मोफत आरोग्य सेवा मिळणार आहे.

हे शिबिर मंगळवार, दि. १४ एप्रिल २०२६ रोजी सकाळी १० ते दुपारी १ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आले आहे. स्थळ : विद्यानगर गार्डन, नगर–दौंड रोड, अहिल्यानगर. या शिबिरात विविध क्षेत्रातील तज्ज्ञ डॉक्टरांकडून सर्वरोग तपासणी, रक्तदाब व रक्तशर्करा तपासणी, डोळ्यांची तपासणी, स्त्रीरोग व दंत तपासणी आदी सेवा दिल्या जाणार आहेत. तसेच आवश्यक रुग्णांना मोफत औषधांचे वितरणही करण्यात येणार आहे.

सदर शिबिराचे आयोजन 'दि. साल्व्हेशन आर्मी इंटरनॅशनल ट्रस्ट हॉस्पिटल', संपूर्ण सुरक्षा केंद्र जिल्हा रुग्णालय, रोटरी क्लब ऑफ अहिल्यानगर व एच. व्ही. देसाई नेत्र रुग्णालय, पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने करण्यात आले आहे. शिबिरात सहभागी होण्यासाठी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. या उपक्रमामुळे परिसरातील गरजू व सामान्य नागरिकांना मोठा दिलासा मिळणार असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त हा एक सामाजिक उपक्रम ठरणार आहे.

## आर्य चाणक्यमध्ये बँकिंग कार्यशाळा संपन्न

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पैठण–** आर्य चाणक्य प्रा, विद्या मंदिरा मध्ये इ६ वी व ७वी च्या विद्यार्थ्यांसाठी आर्थिक साक्षरता अंतर्गत बँक व बँकेचे व्यवहार याविषयी मार्गदर्शन करण्यात आले.

या कार्यशाळेचे अध्यक्ष तथा मुख्याध्यापक भास्कर कुलकर्णी तसेच कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक ज्ञानेश्वर खराद हे होते. मान्यवरांच्या हस्ते प्रतिमा पूजन करून कार्यशाळेची सुरूवात करण्यात आली.

ज्ञानेश्वर खराद यांनी विद्यार्थ्यांना बँक म्हणजे काय? बँकेत खाते कसे उघडावे? बचतखाते व चालू खाते म्हणजे ? म्हणजे काय? ठेवीचे विविध प्रकार, कर्जाचे प्रकार व त्यावर आकारले जाणारे व्याज पासबुक ,चेक, याविषयी प्रात्यक्षिका सह मार्गदर्शन केले. यात विद्यार्थ्यांना पडलेल्या प्रश्नाविषयी सविस्तर माहिती देवून त्यांच्या शंकाचे निरसन केले.

या उपक्रमा द्वारे विद्यार्थ्यामध्ये आर्थिक साक्षरता हे मूल्य जोपासण्यात आले व विद्यार्थ्याच्या मनातील बँकेविषयी असलेली भिती दूर करण्यात आली. सदरील कार्यक्रम गणित मंडळा अंतर्गत राखी धोकटे तसेच शुभांगी सदावर्ते यांनी घेतला व मनोज शिंगारे,विनोद सरोदे,धिरज हंडरगुळे,बाळासाहेब लाड, सतिश आहेर व शिखा शहा, प्रियंका निकाळजे, ग्रीष्मा चौके यांनी यासाठी सहकार्य केले.

## उद्योगविश्वाशी संवाद साधणारा पॉडकास्ट लाँच बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांचा अभिनव उपक्रम

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर येथील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंट स्टडीज, करिअर डेव्हलपमेंट अँड रिसर्च मधील बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांनी पॉडकास्ट लाँच केले आहे. या चॅनलवरील पहिल्याच व्हिडिओला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे.

या पॉडकास्टमध्ये प्रसिद्ध उद्योजक श्री. आदेश चंगेडिया (चंगेडिया आउटडोरचे संस्थापक) यांची विशेष मुलाखत घेण्यात आली. या विषयावर आधारित या संवादातून त्यांनी आपल्या उद्योजकीय प्रवासातील अनुभव, संघर्ष आणि यशोगाथा विद्यार्थ्यांसमोर मांडली. विद्यार्थ्यांच्या पुढाकारातून राबविण्यात आलेल्या या उपक्रमाचा उद्देश उद्योगविश्वातील वास्तव विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे हा आहे. ' हा बीबीए व बीसीए विद्यार्थ्यांचा विद्यार्थी–नेतृत्वाखालील उपक्रम असून, उद्योग क्षेत्रातील तज्ज्ञांशी थेट संवाद



साधून विद्यार्थ्यांना व्यावहारिक ज्ञान मिळवून देण्याचा प्रयत्न यामधून केला जात आहे.

सदर पॉडकास्टचे रेकॉर्डिंग आय.एम.एस. कॅम्पसमध्ये पार पडले असून, ९ एप्रिल २०२६ रोजी हा व्हिडिओ यूट्यूबवर प्रकाशित करण्यात आला. अल्पावधीतच मोठ्या प्रमाणावर प्रेक्षकांनी प्रतिसाद दिल्यामुळे विद्यार्थ्यांच्या या प्रयत्नांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

या उपक्रमासाठी संचालक डॉ. एम. बी. मेहता व उपसंचालक डॉ. विक्रम बार्नबस यांचे मार्गदर्शन लाभले असून, विभाग समन्वयक डॉ. हर्षवर्धन भावसार तसेच बी.सी.ए. विभाग समन्वयक डॉ. सय्यद मुदस्सर यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. तसेच या पॉडकास्टचे दिग्दर्शन प्रा. सायली तोरणे यांनी केले. ''या पॉडकास्ट उपक्रमात गांधी सुयश, बागरेचा कल्याण, गांधी चेतन, गुंडू पियुष, कुलकर्णी ईश्वरी, कासार ऋचा, शेख खुदेजा, जाधव प्रतीक, सोनटक्के प्रेरणा, ढाबळे जयलक्ष्मी, शेख झेबा, शेलके सदभक्ती, आहुजा अमरीत, लोहाडे निर्मल, थोरात युवराज, शेलके चैतन्य, कोतकर शुभम आदी विद्यार्थ्यांचा सक्रिय सहभाग होता. या उपक्रमात श्री. विजय पाटोळे व श्री. संदेश पाटोळे यांनी नॉन–टीचिंग विभागातून मोलाचे सहकार्य केले. कॉलेज प्रशासनाच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांनी साकारलेला हा उपक्रम भविष्यातही अशाच प्रेरणादायी व्यक्तींच्या मुलाखती घेऊन पुढे नेण्याचा मानस व्यक्त करण्यात आला आहे.

## व्यवसायाशी प्रामाणिक रहा यश हमखास – आ. काशिनाथ दाते सर

### 'माय फोन कॉर्नर' शुभारंभाने उद्योजकतेचा नवा अध्याय!



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**पारनेर–** आजच्या डिजिटल युगात मोबाईल फोन ही केवळ सुविधा नसून प्रत्येकाच्या दैनंदिन जीवनातील अत्यावश्यक गरज बनली आहे. त्यामुळे या क्षेत्रात प्रचंड संधी उपलब्ध असून गणेश औटी व भुषण लटांबळे यांनी निवडलेला व्यवसाय दूरदृष्टीचा व भविष्यकालीन दृष्टिकोन असलेला असून त्यांच्या माध्यमातून आज सुरु होत असलेल्या 'माय फोन कॉर्नर'च्या शुभारंभाने उद्योजकतेचा नवा अध्याय सुरू होत असून व्यावसायाशी प्रामाणिक रहा यश हमखास येते असे मत आमदार काशिनाथ दाते सर यांनी पारनेर शहरातील नवी पेठ परिसरात सुरू झालेल्या 'माय फोन कॉर्नर' या आधुनिक मोबाईल शोरूमच्या शुभारंभ प्रसंगी व्यक्त केले.

या शुभारंभ प्रसंगी माजी नगराध्यक्ष विजुभाऊ औटी, मा. जिल्हा परिषद सदस्य राजाभाऊ एरंडे, नगरसेवक अशोक चेडे, राजेंद्र औटी, ॲड. तुषार औटी, उद्योजक रामदास मते, धोंडिभाऊ पुजारी, संभाजी मगर, सरपंच देवा लटांबळे, उद्योजक दादाभाऊ लटांबळे, अर्जुन लंके, गोपी गाडगे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

यावेळी आमदार काशिनाथ दाते बोलताना पुढे म्हणाले की, ''मोबाईल विक्रीसोबतच ग्राहकांना दर्जेदार सेवा देणे, नवीन तंत्रज्ञानाची माहिती ठेवणे, योग्य मार्गदर्शन करणे आणि विश्वासार्हता टिकवणे ही या व्यवसायातील यशाची खरी गुरुकिल्ली आहे. आज ग्राहक केवळ वस्तू खरेदी करत नाही, तर तो विश्वास आणि सेवा शोधत असतो. त्यामुळे विक्रीनंतरची सेवा, योग्य किंमत, आणि ग्राहकांशी प्रामाणिक व्यवहार हे या व्यवसायात अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत.''

''कोणताही व्यवसाय करताना प्रामाणिकपणा, सातत्य आणि चिकाटी या तीन गोष्टी अत्यावश्यक आहेत. या गुणांच्या जोरावर कोणताही व्यवसाय यशाच्या शिखरावर पोहोचतो. तरुणांनी नोकरीच्या मागे न लागता उद्योजकतेकडे वळणे ही काळाची गरज असून अशा उपक्रमांमुळे स्थानिक पातळीवर रोजगारनिर्मितीलाही चालना मिळते,'' असेही त्यांनी यावेळी नमूद केले.

पारनेर शहरातील या कार्यक्रमास स्थानिक नागरिकांची व व्यवसायिकांची मोठी उपस्थिती यावेळी जाणवली असून, 'माय फोन कॉर्नर' नव्या व्यवसायामुळे पारनेरच्या व्यापारी क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाल्याची भावना उपस्थितांच्या माध्यमातून व्यक्त करण्यात आली.

> **'माय फोन कॉर्नर हा व्यवसाय केवळ विक्रीपुरता मर्यादित न राहता ग्राहकांच्या विश्वासाचा केंद्रबिंदू ठरावा आणि आपल्या युवकांनी प्रगतीची नवी उंची गाठावी,'' तंत्रज्ञानाच्या नव्या युगात तुमची वाटचाल यशस्वी होवो! युवकांनी व्यवसायातून प्रगती करावी, युवक सक्षम तर देश सक्षम, व्यवसाय हाच खरा मार्ग आहे, उद्योजक बना, प्रगतीचा नवा अध्याय लिहा माझ्या शुभेच्छा तुमच्या बरोबर आहेत.**
>
> **आ. काशिनाथ दाते सर,**
> **(विधानसभा सदस्य)**

## आरोग्य सेवेच्या माध्यमातून समाजसेवा हीच खरी पुण्याई - अनिल झोडगे

### महात्मा फुले जयंती व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती निमित्ताने भिंगार बँकेच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिर उत्साहात संपन्न



दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिराव फुले व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भिंगार अर्बन को.ऑप. बँक लि. यांच्या वतीने स्वस्तिक हॉस्पिटल (नेत्र, मॅटर्निटी, सर्जिकल, त्वचा) यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. भिंगार येथील मुख्य शाखेत पार पडलेल्या या शिबिराचे उद्घाटन बँकेचे चेअरमन अनिल झोडगे यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी व्हा. चेअरमन किसन चौधरी, स्वस्तिक हॉस्पिटलचे डॉ. प्रफुल्ल चौधरी तसेच संचालक राजेंद्र पतके, कैलासराव खरपुडे, विष्णू फुलसौंदर, महेश झोडगे, माधव गोंधळे, रुपेश भंडारी, कैलास रासकर , कैलास दळवी, एकनाथराव जाधव, नामदेवराव लंगोटे, श्रीमती. तिलोत्तमा करांडे, अनिता भुजबळ, तज्ञ संचालक रामसुख मंत्री, राजेंद्र बोरा (..) मुख्य कार्यकारी अधिकारी शशीकांत महाजन उपस्थित होते. मंडळ उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या प्रारंभी भिंगार बँकेच्या आवारातील महात्मा फुले यांच्या पुतळ्यास सर्व संचालकांच्या वतीने पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. त्यानंतर शिबिराला सुरुवात झाली. या शिबिरामध्ये एकूण सुमारे साडेतीनशे रुग्णांची नेत्र तपासणी करण्यात आली. तसेच मोतीबिंदू शस्त्रक्रिया अत्यल्प दरात उपलब्ध करून देण्यात आली. शिबिरातील रुग्णांना चष्म्यांवर ५० टक्के सवलतही देण्यात आली.

यावेळी बोलताना चेअरमन अनिल झोडगे म्हणाले की, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी समाजातील वंचित घटकांना मुख्य प्रवाहात आणण्यासाठी आयुष्यभर कार्य केले. त्यांच्या विचारांची प्रेरणा घेऊनच भिंगार अर्बन बँक सामाजिक बांधिलकी जपत विविध उपक्रम राबवत आहे. आरोग्य हीच खरी संपत्ती असून सर्वसामान्य नागरिकांना दर्जेदार आरोग्य सुविधा परवडणाऱ्या दरात मिळाव्यात, हा आमचा प्रयत्न आहे.

ते पुढे म्हणाले, ''भिंगार अर्बन बँक ही केवळ आर्थिक व्यवहारापुरती मर्यादित न राहता समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध आहे. अशा शिबिरांच्या माध्यमातून नागरिकांना वेळेवर निदान व उपचार मिळतात, त्यामुळे मोठ्या आजारांपासून बचाव होतो. आगामी काळातही आरोग्य, शिक्षण व सामाजिक क्षेत्रात अशा अनेक उपक्रमांचे आयोजन करण्यात येईल.

व्हा. चेअरमन किसन चौधरी यांनी आपल्या मनोगतात सांगितले की, बँकेच्या माध्यमातून समाजोपयोगी कार्य करण्याचा आमचा नेहमीच प्रयत्न असतो. आजच्या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाल्यामुळे आमचा उत्साह अधिक वाढला आहे. पुढील काळात आणखी व्यापक स्वरूपात अशा शिबिरांचे आयोजन करण्यात येईल. यावेळी ह.भ.प. अमित महाराज धाडगे म्हणाले की, भिंगार अर्बन बँक ही समाजासाठी कार्य करणारी संस्था असून येत्या काही दिवसांमध्ये भिंगार शहरात सर्व रोग निदान शिबिराचे भव्य आयोजन करण्यात येणार आहे. त्या शिबिरामध्ये सर्व सुविधा मोफत दिल्या जाणार असून नागरिकांनी त्याचा मोठ्या प्रमाणात लाभ घ्यावा.

## आर्किटेक्चरच्या (वास्तुकला) २०२६ प्रवेशासाठी नाटा परीक्षा सुरु

दैनिक आकर्षण । प्रतिनिधी

**अहिल्यानगर–** देशभरातील वास्तुकला महाविद्यालयांमध्ये प्रवेश घेण्यासाठी आवश्यक असलेली नॅशनल ॲप्टिट्यूड टेस्ट इन आर्किटेक्चर २०२६ परीक्षेची प्रक्रिया सुरु झाली आहे . कौन्सिल ऑफ आर्किटेक्चरद्वारे आयोजित केली जाणारी ही परीक्षा बी.आर्च या पाच वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी अनिवार्य आहे.

वास्तुकला क्षेत्रातील करिअरसाठी अहिल्यानगर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांसाठी वाळूंज येथील रमेश फिरोदिया कॉलेज ऑफ आर्किटेक्चर हे नामांकित आणि प्रतिष्ठित महाविद्यालय आहे. जिल्ह्यातील अग्रगण्य संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या या महाविद्यालयातून दर्जेदार आर्किटेक्ट घडत असून, नाटा परीक्षेच्या तयारीसाठीही येथील तज्ज्ञांचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना लाभत आहे.

नाटा २०२६ ची नोंदणी प्रक्रिया सुरू झाली असून याची नोंदणी २०२६ वेब साईट वर विद्यार्थ्यांनी करावी, परीक्षेची पहिली फेज ४ एप्रिल २०२६ ते १३ जुन २०२६ पर्यंतच्या प्रत्येक शुक्रवारी दुपारच्या सत्रात आणि प्रत्येक शनिवारी दोन सत्रात घेतली जाणार आहे .एक विद्यार्थी जास्तीत जास्त दोन वेळा ही परीक्षा देऊ शकतो, आणि परीक्षेची दुसरी फेज ७ व ८ ऑगस्ट २०२६ रोजी असून जे विद्यार्थी पहिल्या फेज ला बसू शकले नाही त्यांनाच हि परीक्षा एकदाच देता येऊ शकणार आहे परंतु या विद्यार्थाना ऍडमिशन प्रक्रिया पूर्ण झाल्यावर रिक्त असलेल्या जागांसाठीच प्रवेश घेता येऊ शकेल. परीक्षेच्या अधिक माहितीसाठी https://nata.in या वेबसाईटला भेट द्या.

प्रवेश परीक्षेच्या अधिक माहितीसाठी आणि मार्गदर्शनासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयाच्या ॲडमिशन सेलशी ८६०५०५३०२५ / ९८६०४९५४९४ क्रमांकावर संपर्क साधावा: ईमेल: phirodia@rediffmail.com अधिकृत संकेतस्थळ: www.rpetarchitecture.com


**आकर्षण** हे सायं. दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक विजय शामराव सांगळे यांनी विराज मुद्रणालय, प्लॉट क्र. ९२,भगवान बाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, अहिल्यानगर (महानगरपालिका) अहिल्यानगर – ४१४००३ (महाराष्ट्र) येथे (मुद्रीत) छापुन आकर्षण ऑफिस– प्लॉट नं. ९२, भगवानबाबा चौक, निर्मलनगर, सावेडी, नगर–मनमाड रोड, अहिल्यानगर– ४१४००३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. *संपादक – विजय शामराव सांगळे, मुख्य कार्यालयाचा फोन नंबर – ७७७६८१२८११. ई–मेल : dainikaakarshan@gmail.com (* पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी यांच्यावर राहील.) (वाद अहिल्यानगर न्यायालयीन कक्षेत)

The Evening Daily Aakarshan is printed by the owner, printer, publisher Vijay Shamrao Sangale at Viraj Mudranalay, plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar, 414003 (Maharashtra) and Published at plot no.92, Bhagvanbaba Chauk, Nirmalnagar, savedi, Nagar-Manmad road, Ahilyanagar 41403 (Maharashtra). *Editor - Vijay Shamrao Sangale, Phone no. of main office - 7776812811. Email - dainikaakarshan@gmail.com (*The responsibility under the PRB Act will be on him.)

## दै. आकर्षण निवडक

### अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे वतीने महात्मा फुले यांना अभिवादन



अहिल्यानगर- महात्मा ज्योतिबा फुले हे १९व्या शतकातील थोर समाजसुधारक, विचारवंत आणि क्रांतिकारक होते. १८४८ मध्ये पुण्यातील भिडे वाड्यात मुलींसाठी भारतातील पहिली शाळा सुरू केली. त्यांच्या पत्नी सावित्रीबाई फुले या पहिल्या स्त्री शिक्षिका बनल्या. २४ सप्टेंबर १८७३ रोजी सत्यशोधक समाज स्थापन केला.जातिभेद आणि अंधश्रद्धा यांच्या विरोधात जनजागृती केली.अस्पृश्यता आणि जातिव्यवस्थेविरुद्ध प्रखर लढा दिला. पाण्याचे हौद सर्वांसाठी खुले केले.विधवा व अनाथांसाठी कार्य केले.महात्मा फुलेंनी सत्य हाच एक धर्म हा विचार मांडला.असे प्रतिपादन अ.भा.महात्मा फुले समता परिषदेचे महानगर जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे यांनी केले आहे. माळीवाडा येथे थोर समाज सुधारक महात्मा फुले यांच्या जयंतीनिमित्त अ.भा.महात्मा फुले समता परिषदेच्या वतीने त्यांच्या पुतळ्याचे पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.याप्रसंगी आखिल भारतीय महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश उपाध्यक्षअंबादास गारुडकर, प्रदेश चिटणीस अनिल निकम, महानगर कार्याध्यक्ष अभिषेक चिपाडे,महानगर जिल्हाध्यक्ष ब्रिजेश ताठे, देवेंद्र दुधाले, कैलास फुलसौंदर, शंकर आव्हाड,रमेश चिपाडे,शामराव व्यवहारे,मंगेश खंगले, साहेबराव विधाते,शुभम आव्हाड,रोहित व्यवहारे, स्वप्निल राऊत, अविनाश ताठे, नारायण इवळे,पंडित औसरकर, कपिल सुडके, विनोद पुंड, रामभाऊ व्यवहारे, वैभव गोरे, सुनील अक्साळ,नितीन यंदे,अमृत क्षीरसागर आदी उपस्थित होते.

### एआयओसीडी कडून ९३ व्या डीटीएबी बैठकीच्या अजेंडावर एकत्रित निवेदन सादर

अहिल्यानगर - द ऑल इंडिया ऑर्गनायझेशन ऑफ केमिस्ट्स् ॲण्ड ड्रगिस्ट्स् (एआयओसीडी) यांनी १६ फेब्रुवारी २०२६ रोजी झालेल्या ९३व्या ड्रग टेक्निकल ॲडव्हायझरी बोर्ड (डीटीएबी) बैठकीतील महत्त्वाच्या अजेंडा मुद्द्यांवर (२, ५, ७, ९ आणि १२) सविस्तर निवेदन सादर केले असल्याची माहिती केमिस्ट्स् असोसिएशनचे जिल्हाध्यक्ष दत्ता गाडळकर व सचिव आबासाहेब बेद्रे यांनी दिली. एआयओसीडीचे अध्यक्ष जगन्नाथ शिंदे आणि महासचिव राजीव सिंगल यांनी संयुक्तरित्या सादर केलेल्या निवेदनात सार्वजनिक आरोग्य, औषधांचा योग्य व विवेकी वापर आणि नियमनबद्ध औषध वितरण प्रणालीच्या संरक्षणासाठी संघटनेची कटिबद्धता अधोरेखित करण्यात आली आहे. तसेच बेकायदेशीर व अनियंत्रित फार्मसीच्या वाढत्या प्रमाणाबाबत गंभीर चिंता व्यक्त करत, यामुळे रुग्णांच्या सुरक्षिततेला धोका निर्माण होत असल्याचे नमूद करण्यात आले आहे.महत्त्वाच्या प्रस्तावांवर संघटनेने भूमिका मांडली आहे. यामध्ये गुड डिस्ट्रिब्युशन प्रॅक्टिसेस (जीडीपी): एआयओसीडीने या प्रस्तावाचे स्वागत केले असले, तरी तो टप्प्याटप्प्याने आणि व्यवहार्य पद्धतीने लागू करण्याची मागणी केली आहे.


### ह भ प भास्करगिरी महाराजांना मातृशोक

अहिल्यानगर- श्रीक्षेत्र देवगड संस्थान, श्री गुरुदेव दत्त पिठाचे महंत परमपूज्य गुरुवर्य भास्करगिरीजी महाराज यांच्या मातोश्री सरुबाई ज्ञानदेव पेसोडे यांचे रविवार दि.१२ ०४/२०२६ रोजी सकाळ ठीक-१४ मी.वाजता अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. त्यांचा अंत्यविधी श्रीक्षेत्र देवगड संस्थान परिसरात करण्यात आला आहे. मृत्यू समयी त्यांचे वय ९९ वर्षे होते. सरूबाई ज्ञानदेव पेसोडे यांच्या पश्चात दोन मुले ह भ प भास्करगिरी महाराज व मधुकर पेसोडे व कन्या कमलबाई रायपुरे आहेत. सरुबाई ज्ञानदेव पेसोडे यांच्या दुःखद निधनाने देवगड परिसरातील नागरिकांवर तसेच भक्त परिवारावर शोककळा पसरली आहे.



# पेडगाव किल्ल्याच्या दुरुस्तीसाठी ग्रामस्थांनी पुढाकार घ्यावा

## वास्तुविशारद काजल दरेकर-जंजिरे यांचे आवाहन



**अगं बया ! आपली काजल कशी धाडधाड बोलतिया बघा की..!**

**कार्यक्रमाला उपस्थितांसमोर गावच्या सूनबाई असलेल्या काजल यांनी सत्काराला उत्तर देताना एखाद्या निष्णात वक्त्याप्रमाणे मुद्देसूद मांडणी करीत छोटेखानी भाषण केले. त्यावेळी ज्येष्ठ मंडळींसह गावक-यांना काजल यांचे खूपच कौतुक वाटले. महिलांना काजल यांच्या भाषणाचे खूपच अप्रूप वाटले. त्या कुजबुज करीत 'अग बया ! आपली काजल कशी धाड धाड बोलतिया बघा की..!' असे एकमेकींना म्हणत होत्या. इतर प्रेक्षकांमध्येही काजल यांच्या मार्दर्शनपर भाषणाची व त्यांनी दिलेल्या पेडगाव किल्ल्याबाबतच्या माहितीची चर्चा रंगली होती.**

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** श्रीगोंदे तालुक्यातील पेडगावचा धर्मवीर गड हा किल्ला भावी पिढ्यांसाठी इतिहासाची साक्ष व प्रेरणा देणारा ऐतिहासिक वारसा आहे. त्यामुळे किल्ल्याची दुरुस्ती, सुशोभिकरण व संवर्धनासाठी पेडगाव ग्रामस्थांनी पुढाकार घेवून राजकीय व शासकीय पातळीवर प्रयत्न करणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन प्रसिद्ध वास्तुविशारद काजल दरेकर-जंजिरे यांनी केले.

काजल दरेकर-जंजिरे या पेडगावचे सुपूत्र व सहायक पोलीस आयुक्त महेश ईश्वर जंजिरे यांच्या पत्नी आहेत. त्या पुण्यातील प्रसिद्ध वास्तुविशारद असून, लँडस्केप हा त्यांच्या आवडीचा विषय आहे. आपल्या पेडगाव या गावातील साडेतीनशे वर्षांचा ऐतिहासिक साक्षीदार असलेल्या धर्मवीर गडासंदर्भात ( पेडगाव किल्ला) काजल यांनी दिल्ली येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत पेडगाव किल्ल्याबाबत शोधनिबंध मांडीत सविस्तर सादरीकरण केले. त्यामुळे अगोदरच प्रसिद्ध असलेला हा किल्ला आता राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय पातळीवर चर्चिला जावू लागला आहे.

या कामगिरीबद्दल पेडगाव ग्रामस्थांनी काजल दरेकर-जंजिरे यांचा भैरवनाथ मंदिराच्या पटांगणात सत्कार सोहळा आयोजित केला होता. त्यावेळी सत्काराला उत्तर देताना काजल बोलत होत्या. पेडगावचे सरपंच इरफान पिरजादे व माजी उपसरपंच अशोक गोधडे यांच्या हस्ते काजल दरेकर-जंजिरे यांना फेटा बांधून आणि शाल व श्रीफळ देवून गौरविण्यात आले. ज्येष्ठ नेते हरिदास शिर्के, पंचायत समितीचे माजी उपसभापती गणेश झिटे, माजी सरपंच रोहिदास पवार, माजी सरपंच बबनराव कणसे, प्रतिभाताई झिटे, बांधकाम व्यावसायिक ईश्वर जंजिरे, सामाजिक कार्यकर्ते सुरेश जंजिरे, महिला बचत गटाच्या नेत्या सुनीता जंजिरे यांच्यासह महिला, युवक, विद्यार्थीनी व ग्रामस्थ यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

काजल यांनी यावेळी किल्ल्यासंदर्भातील शोधनिबंध व सादरीकरणात मांडलेल्या विविध बाबींचा उहापोह करीत अनेक गावक-यांनाही माहिती नसलेले पैलू ग्रामस्थांसमोर उलगडविले.

काजल यांच्या या सादरीकरणामुळे किल्ल्याची महती व माहिती जगभर पोचली आहे. जंजिरे कुटुंबाप्रमाणेच गावाची सेवा करण्याची काजल यांची उपजत वृत्ती दिसून येते. त्यामुळेच काजल व त्यांचे पती सहायक पोलीस आयुक्त महेश जंजिरे ग्रामस्थांच्या कौतुकास पात्र आहेत. त्या पार्श्वभूमीवर काजल यांचा आज गावकरी गौरव करीत असल्याचे गौरवोद्गार सरपंच इरफान पिरजादे यांनी यावेळी काढले. काजल यांच्या आवाहनाला प्रतिसाद देत ग्रामस्थ संघटितपणे पेडगाव किल्ल्याची दुरुस्ती, सुशोभीकरण व जतन करण्यासाठी विशेष पुढाकार घेतील, असेही पिरजादे यांनी स्पष्ट केले. गावाप्रती असलेल्या प्रेम भावनेतून काजल यांनी केलेल्या दमदार सादरीकरणाबद्दल वयोवृद्ध मंडळींसह महिला, युवक व विद्यार्थ्यांनी काजल यांचे समक्ष भेटून कौतुक केले.

# महामानवांचे स्मृतिस्थाने ही आपली तीर्थक्षेत्रे असावीत

## डॉ. नागेश गवळी यांचे प्रतिपादन; कुकाणे येथे जाणता राजा ग्रुपचा कार्यगौरव पुरस्कार वितरण सोहळा संपन्न




**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**नेवासा-** महात्मा जोतीराव फुले यांचे शिक्षण हे चिकित्सा करायला लावणारे शिक्षण होते. सत्यमेव जयते या अमर संदेशाचा पुनरुच्चार करणारे ते आधुनिक भारतातील पहिले महापुरुष होते. बहुजन समाजाच्या उद्धार करणाऱ्या महामानवांचे स्मृतिस्थाने ही आपली तीर्थक्षेत्रे असावीत. महापुरुषांना जात म्हणून नव्हे तर विचार म्हणून स्वीकारण्याची गरज आहे असे प्रतिपादन प्रसिद्ध व्याख्याते डॉ. नागेश गवळी यांनी केले. कुकाणे (ता. नेवासे) येथे जाणता राजा ग्रुप, सावता परिषद व समता परिषद आयोजित क्रांतिसूर्य महात्मा ज्योतिराव फुले यांची १९९ वी जयंती उत्सव व विविध क्षेत्रात उल्लेखनीय व प्रेरणादायी कामगिरी करणाऱ्या कर्तृत्ववान व्यक्तींना कार्यगौरव पुरस्कार वितरण सोहळा प्रसंगी डॉ. गवळी बोलत होते. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री ज्ञानेश्वर मंदिर संस्थानचे अध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग होते.

पुरस्कार वितरण सोहळ्यास जागृत शिनाई देवस्थानचे उत्तराधिकारी बालब्रम्हचारी महंत श्री आवेराजजी महाराज, समताचे जिल्हाध्यक्ष प्रशांत शिंदे, मच्छिंद्र गुलदगड, रावसाहेब जावळे, सरपंच लताताई अभंग, दत्तात्रय काळे, उत्तमराव पाटील, रामदास गोल्हार, डॉ श्रुती आमले पाटील, नामदेव उंडे, बाळासाहेब पाटील, दिनकर गर्जे, एकनाथ कावरे, अमोल अभंग, भाऊसाहेब सावंत, मोहनराव गायकवाड, प्रा. श्रीहरी तांबडे, भैरवनाथ भारस्कर, अड. नीरज नांगरे, सेनेचे संजय पवार, ठाकरे सेनेचे मछिंद्र म्हस्के, मछिंद्र कावरे, श्रीधर कासार आदी उपस्थित होते.

पुरस्काराला उत्तर देतांना अड. सुमतीताई घाडगे पाटील म्हणाल्या कि, क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिराव फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या शैक्षणिक विचारांचा वारसा घेऊन साहेबराव घाडगे पाटील यांनी त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठानची स्थापना केली. ग्रामीण भागातील मुलींना शिक्षणाच्या प्रवाहामध्ये आणण्यासाठी मुलांपेक्षा मुलींची फी कमी ठेवली. शैक्षणिक संकुलाच्या परिसरामध्ये जलसंधारणाचे मोठे काम उभे केले, त्यामुळेच संस्था आज जलस्वयंपूर्ण असून अनेक शेतकऱ्यांनी त्यांचा लाभ होत

विकास अंत्रे म्हणाले, ''महापुरुषांच्या विचारांचा वारसा आणि सत्कार्य करणाऱ्यांचा गौरव संत ज्ञानदेवांच्या भूमीत होतं असून सदविचारांची पणती महापुरुषांच्या विचारांचा जागर करून लावली जात आहे. अवती भोवती नकारात्मकतेच्या पायघडया पडत असतांना महापुरुषांच्या विचारांच्या वाटेच्या लढाईला यामुळे बळ मिळत आहे. यावेळी माजी आमदार पांडुरंग अभंग, जगन्नाथ गोसावी यांच्यासह सर्व पुरस्कारार्थींनी आपले मनोगत व्यक्त केले.

जाणता राजा ग्रुपचे अध्यक्ष प्रा.सुनील गर्जे यांनी प्रास्ताविक केले.उपाध्यक्ष राहुल जावळे यांनी उपस्थितांचे स्वागत केले.

**कार्यगौरव पुरस्कार सन्मानार्थी असे**

**त्रिमूर्ती शैक्षणिक संस्थेच्या अध्यक्षा अड. सुमतीताई घाडगे पाटील, त्रिमूर्ती पावन प्रतिष्ठान, नेवासे फाटा (शैक्षणिक), पत्रकार विकास अंत्रे,श्रीरामपुर (साहित्य ), अक्षय बोराडे,जुन्नर (सामाजिक), मतीन भोसले, अमरावती (सामाजिक), विजय देशमुख, सुलतानपूर (कृषी), फुलचंद रोकडे, शेवगाव (सामाजिक), रावसाहेब मगर,शरणपूर वृद्धाश्रम,कौठा (सामाजिक) यांना कार्यगौरव पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.**

## देवदैठण येथे पाण्यात बुडून तरुणाचा मृत्यू; मुलाला वाचवण्यात यश

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**बेलवंडी-** श्रीगोंदा तालुक्यातील देवदैठण येथे रविवारी १२ एप्रिल रोजी सकाळी सुमारे १० वाजण्याच्या सुमारास घडलेल्या दुर्दैवी घटनेत ४० वर्षीय अमित रंगनाथ साठे यांचा पाण्यात बुडून मृत्यू झाला. दरम्यान, त्यांच्या मुलाला वेळेत बाहेर काढण्यात यश आल्याने मोठी जीवितहानी टळली.

याबाबत अधिक माहिती अशी की, अमित साठे हे आपल्या ९ वर्षीय मुलगा साहील (इयत्ता चौथी) याला पोहायला शिकवण्यासाठी गावातील संत निमराज महाराज मंदिर व दधीची ऋषी मंदिराच्या मागील सिद्ध नदीवरील केटी मधील पाण्या मधे गेले होते. यावेळी पाण्याचा अंदाज न आल्याने अमित साठे पाण्यात बुडाले.

घटनेदरम्यान साहील हाही पाण्यात बुडत होता. त्याच वेळी तेथून जात असलेल्या सुधीर धोत्रे या तरुणाने प्रसंगावधान राखत तात्काळ धाव घेतली आणि साहीलला सुरक्षित बाहेर काढले. नवनाथ जाधव या तरुणाने अर्धा तास शोध मोहीम केली परंतु तो दमला असल्याने काही ग्रामस्थांनी त्याला शोधमोहीम थांबवण्यास सांगितले.

घटनेची माहिती मिळताच ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने घटनास्थळी धाव घेतली. सरपंच व स्थानिक नागरिकांनी बेलवंडी पोलिसांना कळविले. त्यानंतर रायगव्हाण येथील एकलव्य संघटनेच्या बचाव पथकाने शोधमोहीम राबवून अमित साठे यांचा मृतदेह बाहेर काढला.

या बचाव कार्यात काळू निकम, करण माळी, राहुल गायकवाड, बन्नी जाधव, दादू गायकवाड यांचा सहभाग होता. तसेच दौलत नाना शितोळे यांची डिसास्टर रिस्क्यू फोर्स व रांजणगाव एमआयडीसी येथील अग्निशामक दल घटनास्थळी दाखल झाले होते. मृतदेह पुढील शवविच्छेदनासाठी शिरूर येथे पाठविण्यात आला असून, या घटनेचा तपास बेलवंडी पोलीस करीत आहेत. या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## जिद्द, चिकाटी आणि यश! बी. जे. मेडिकल कॉलेज, पुणे येथून गायत्री कुटे एमबीबीएस

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**पारनेर-** पळवे (ता. पारनेर) येथील गायत्री (सुनीता एकनाथ) कुटे हिने जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमांच्या जोरावर बी. जे . मेडीकल कॉलेज व ससून जनरल हॉस्पिटल पुणे येथुन एमबीबीएस पदवी संपादन करत उल्लेखनीय यश मिळवले आहे. वैद्यकीय क्षेत्रातील प्रतिष्ठेची समजली जाणारी ही पदवी मिळवत तिने स्वतःचे आणि कुटुंबाचे स्वप्न साकार केले आहे. घरात देशसेवेचा वारसा असणाऱ्या गायत्रीने शिक्षणाच्या प्रवासात अनेक अडचणींवर मात करत सातत्याने अभ्यास केला. कठीण परिस्थितीतही तिने हार न मानता आपले ध्येय डोळ्यासमोर ठेवले आणि अखेर ते गाठण्यात यश मिळवले. तिच्या या जिद्दीमुळे आणि चिकाटीमुळे ती आज डॉक्टर बनण्याचा मान मिळवू शकली आहे.

गायत्रीच्या यशाबद्दल आई-वडील, नातेवाईक तसेच गावकऱ्यांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत असून, तिच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या जात आहेत. गावातील तरुणाईसाठी ती एक प्रेरणादायी उदाहरण ठरत आहे.

**माझ्या या यशामागे हॉस्पिटलमधील सर्व सहकारी, मार्गदर्शक शिक्षक, मित्र-मैत्रिणी यांचे अमूल्य मार्गदर्शन आणि पाठबळ आहे. विशेषत: या संपूर्ण प्रवासात आई-बाबांनी दिलेला खंबीर आधार, विश्वास आणि प्रेरणेमुळेच हे यश शक्य झाले. त्यांच्या त्यागाचे हे फळ आहे. पुढील काळात समाजसेवेच्या भावनेतून वैद्यकीय क्षेत्रात कार्य करत गरजू रुग्णांची मनापासून सेवा करण्याचा माझा प्रयत्न असेल.''**

**डॉ. गायत्री कुटे**

## श्री साई निर्माण इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये चिमुकल्यांचा ग्रॅज्युएट डे उत्साहात साजरा

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**शिर्डी-**शिर्डीतील अग्रणी शैक्षणिक संस्था म्हणून ओळखल्या जाणाऱ्या श्री साई निर्माण इंग्लिश मिडीयम स्कूलमध्ये ज्युनियर आणि सिनियर केजीच्या विद्यार्थ्यांचा ग्रॅज्युएट डे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या अनोख्या सोहळ्यात चिमुकल्यांनी चक्क इंग्रजीतून भाषणे करत आणि बहारदार सांस्कृतिक कार्यक्रम सादर करत उपस्थितांची मने जिंकली.

कार्यक्रमासाठी लहान विद्यार्थ्यांनी पदवीदान समारंभाचे पारंपारिक कपडे परिधान केले होते.




विशेष म्हणजे, ज्युनियर आणि सिनियर केजीच्या या चिमुकल्यांनी व्यासपीठावर येऊन चक्क इंग्रजी भाषेतून आपले मनोगत व्यक्त केले. त्यांच्या या आत्मविश्वासाने आणि वक्तृत्वाने उपस्थित पालक आणि शिक्षक थक्क झाले. केवळ भाषणेच नव्हे, तर विविध गाण्यांवर नृत्य सादर करून विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांचे दर्शन घडवले.

या सोहळ्याला संस्थेचे अध्यक्ष विजयराव कोते यांनी आपल्या मातोश्री आणि पत्नीसह प्रमुख पाहुणे म्हणून हजेरी लावली. यावेळी एक आगळावेगळा प्रसंग पाहायला मिळाला. चिमुकल्यांचा उत्साह पाहून आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी विजयराव कोते यांच्यासह त्यांच्या मातोश्री आणि पत्नी यांनीही पदवीधरांचे कपडे परिधान केले. या उपक्रमामुळे मुलांच्या आनंदात अधिकच भर पडली आणि कार्यक्रमात कौटुंबिक वातावरण निर्माण झाले.

# समता आणि शिक्षण हाच समाज परिवर्तनाचा खरा मार्ग - इंजि. बापूसाहेब वराळे

## अहिल्यानगर जिल्हा मराठा नागरी पतसंस्थेत महात्मा फुले जयंती उत्साहात साजरी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** क्रांतीसूर्य महात्मा ज्योतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त अहिल्यानगर जिल्हा मराठा पतसंस्थेच्या वतीने अभिवादनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. यावेळी संस्थेच्या कार्यालयात फुले यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांच्या कार्याला विनम्र अभिवादन करण्यात आले. सामाजिक समतेचा विचार पुढे नेण्याचा संकल्प यावेळी उपस्थितांनी व्यक्त केला.

कार्यक्रमात सार्वजनिक बांधकाम विभागाचे विभागीय अधिकारी तथा मराठा सेवा संघाचे कार्याध्यक्ष इंजिनियर बापूसाहेब वराळे प्रमुख उपस्थित होते. त्यांच्या समवेत पतसंस्थेचे व्हाईस चेअरमन उदय अनभुले संचालक ज्ञानदेव पांडुळे, किसनराव पायमोडे , द्वारकाधीश राजे भोसले, ॲड. राजेश कावरे, अच्युत गाडे, मुख्य कार्यकारी अधिकारी अशोक वारकड, व्यवस्थापक बबन सुपेकर, प्रशांत बोरुडे, मनेश रोहकले आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी बोलताना इंजिनियर बापूसाहेब वराळे म्हणाले की, ''महात्मा फुले यांनी समाजातील अन्याय, अज्ञान आणि विषमता दूर करण्यासाठी आयुष्यभर लढा दिला. त्यांनी शिक्षणाचा प्रसार करून वंचित घटकांना सन्मानाने जगण्याचा अधिकार मिळवून दिला. आजच्या पिढीने त्यांच्या विचारांचे केवळ स्मरण न करता ते प्रत्यक्ष जीवनात उतरवणे गरजेचे आहे.''

व्हाईस चेअरमन उदय अनभुले म्हणाले, ''समाजात खरी प्रगती साधायची असेल तर समता, बंधुता आणि शिक्षण या त्रिसूत्रीचा स्वीकार करावा लागेल. फुले यांचे विचार हे आजही तितकेच प्रेरणादायी असून त्यातूनच समाज परिवर्तनाची दिशा मिळते. प्रत्येक संस्थेने आणि व्यक्तीने सामाजिक बांधिलकी जपून कार्य केल्यास त्यांना खरी आदरांजली ठरेल.''

कार्यक्रमात उपस्थित मान्यवरांनीही महात्मा फुले यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांचे समाजात संवर्धन करण्याची गरज अधोरेखित केली. वातावरणात सामाजिक जागृतीचा संदेश देणारी भावना स्पष्टपणे जाणवत होती.

प्रास्ताविक ज्ञानदेव पांडुळे यांनी केले. सूत्रसंचालन ॲड. राजेश कावरे यांनी केले, तर आभार द्वारकाधीश राजे भोसले यांनी मानले.

## माथणी येथील जिल्हा परिषदेच्या शाळेत लोकसहभागातून गोष्टींचे कार्ड



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर-** नगर तालुक्यातील माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेच्या विद्यार्थ्यांना लोकसहभागातून चेन्नई येथील राजलक्ष्मी फाउंडेशन चेन्नई येथून श्री रामनाथन यांनी विद्यार्थ्यांना ग्रंथालयात वाचनासाठी शंभर जागतिक गोष्टीचे फोटोपेपर कार्ड दिले आहेत. यामुळे विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण होऊन वाचन संस्कृती रुजण्यास मदत झाली आहे. कारण विद्यार्थ्यांना गोष्टी खूप आवडतात.

जागतिक पातळीवरील विविध देशातील सुप्रसिद्ध अशा या गोष्टी आहेत. दर शनिवारी आनंदायी शनिवार निमित्त हा उपक्रम शाळेत राबविण्यात येतो. शाळेत कायमस्वरूपी वाचन उपक्रम राबविला जातो .विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदाव्यात. त्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी. त्यांच्यामध्ये देशहितासाठी योग्य मूल्ये रुजवित म्हणून माथणी येथील जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळेत हा वाचन उपक्रम राबविला जातो.

यासाठी शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनील अडसूळ, राहुल व्यवहारे हे नेहमी विद्यार्थ्यांना वाचण्यासाठी लोकसहभागातून विविध पुस्तके मिळवितात. लोकसहभागातून विद्यार्थ्यांना विविध साहित्य उपलब्ध करून देऊन त्यांना मार्गदर्शन करतात .तसेच यापूर्वी वाचनासाठी लोकसहभागातून विविध पुस्तके मिळविले आहेत. असे अनेक उपक्रम शाळेत राबविले जातात असे शाळेतील उपक्रमशील शिक्षक सुनिल अडसूळ यांनी सांगितले आहे .शाळेत विद्यार्थ्यांना लोकसहभागातून विविध सुविधा निर्माण केल्या आहेत. याबद्दल ग्रामस्थांनी शिक्षकांचे व लोकसहभाग देणाऱ्यांचे विशेष अभिनंदन केले आहे.

# महावीर प्रतिष्ठानचे सामाजिक कार्य आदर्शवत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** अहिल्यानगर शहरातील कोठला स्टँड राज चेंबर्स येथील महावीर प्रतिष्ठानने स्थापनेपासून दोन वर्षांत सामाजिक कार्याचा आदर्श निर्माण केला आहे. प्रतिष्ठानतर्फे वर्षभर थोर व्यक्तींमत्वांच्या जयंती, पुण्यतिथी साजऱ्या केल्या जातात. याशिवाय आरोग्य क्षेत्रातही वेळोवेळी आरोग्य तपासणी शिबिरे घेण्यात येतात. रक्तदान चळवळ वृद्धिंगत होण्यासाठी विविध उपक्रम राबवून जनजागृती केली जाते अशी माहिती प्रतिष्ठानचे अध्यक्ष विजय भंडारी यांनी दिली.

भगवान महावीर स्वामी यांना अभिप्रेत मानवसेवा करण्याच्या उद्देशाने समविचारी मंडळींनी एकत्र येऊन महावीर प्रतिष्ठानची स्थापना केली. प्रतिष्ठानतर्फे दरवर्षी छत्रपती शिवाजी महाराज जयंती दिनी अभिवादन कार्यक्रम घेण्यात येतो. महावीर जयंती, राम नवमी, २८ मार्च रोजी राष्ट्रसंत आचार्य आनंदऋषीजी महाराज पुण्यस्मृती, थोर समाजसुधारक महात्मा फुले जयंती, क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, हनुमान जयंती असे वर्षभर विविध कार्यक्रम साजरे केले जातात. प्रत्येक कार्यक्रमातून समाजाला एकत्र आणून चांगले विचार दिले जातात. परशुराम जयंती निमित्त आयोजित परिक्रमातही प्रतिष्ठानने सहभाग नोंदविला आहे.

आरोग्य जनजागृतीसाठीही वेळोवेळी उपक्रम राबविले जातात. प्रतिष्ठानतर्फे आयोजित नेत्र तपासणी शिबिराचा २५० हून अधिक रूग्णांनी लाभ घेतला. आगामी काळातही विविध उपक्रम राबवून समाजात एकजूट आणि एकोपा निर्माण होण्यासाठी प्रतिष्ठान कार्यरत असणार आहे. प्रतिष्ठानच्या कार्यात अध्यक्ष विजय भंडारी, उपाध्यक्ष अतुल शुक्ला, सेक्रेटरी परेश भंडारी, ट्रस्टी प्रशांत आडेप, मनोज भंडारी आदी सक्रिय योगदान देत असतात.

फ्रेंड्स कॉर्पोरेट क्रिकेट लीगमध्ये रंगल्या रोमहर्षक लढती

# नगर डिस्ट्रिक्ट सीनियर्स व नगर चॅम्पियन्सचा दणदणीत विजय

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** फ्रेंड्स कॉर्पोरेट क्रिकेट लीगमध्ये दोन अत्यंत चुरशीचे सामने पार पडले. खेळाडूंच्या दमदार कामगिरीमुळे प्रेक्षकांना रोमांचक क्रिकेटचा आनंद लुटता आला.

पहिल्या सामन्यात नगर डिस्ट्रिक्ट सीनियर्स संघाने क्रिकेट स्टार करंजी संघावर १९ धावांनी मात करत विजयी सलामी दिली. प्रथम फलंदाजी करताना सीनियर्स संघाने निर्धारित षटकांत ८ गड्यांच्या मोबदल्यात १६२ धावा उभारल्या. या आव्हानात्मक धावसंख्येचा पाठलाग करताना करंजी संघाने चांगली झुंज दिली; मात्र ५ गडी गमावत त्यांना १४३ धावांपर्यंतच मजल मारता आली. सीनियर्स संघाच्या विजयात नासिर कोतवाल यांची उत्कृष्ट कामगिरी ठरली असून त्यांना सामनावीर पुरस्काराने गौरविण्यात आले.

दुसऱ्या सामन्यात ए. बी. ऍक्ट अहिल्यानगर संघ व नगर चॅम्पियन्स यांच्यात रंगतदार सामना झाला. ए. बी. ऍक्ट संघाने प्रथम फलंदाजी करताना ८ फलंदाज गमावत १५७ धावा केल्या. प्रत्युत्तरात नगर चॅम्पियन्स संघाने आक्रमक फलंदाजी करत १७.२ षटकांतच १६० धावा पूर्ण करून शानदार विजय मिळवला. या सामन्यात वैभव वाघ यांनी सर्वांगीण खेळ करत संघाच्या विजयात मोलाचा वाटा उचलला आणि त्यांना सामनावीर म्हणून निवडण्यात आले. दोन्ही सामन्यांमध्ये खेळाडूंनी दाखवलेल्या कौशल्यामुळे स्पर्धेची रंगत अधिकच वाढली असून पुढील सामनेही तितकेच उत्कंठावर्धक होणार असल्याचे संकेत मिळत आहेत.

# जागतिक हायरॉक्स स्पर्धेत स्काय ब्रिजचे मनोज छाजेड यांची कन्या साक्षी छाजेड यांची दमदार कामगिरी

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**




**अहिल्यानगर–** शारीरिक ताकद, सहनशक्ती आणि मानसिक धैर्य यांची कसोटी पाहणारी जगातील सर्वात आव्हानात्मक फिटनेस स्पर्धा अशी ओळख असलेल्या जागतिक हायरॉक्स स्पर्धेत साक्षी मनोज छाजेड यांनी दमदार कामगिरी करत यश संपादित केले आहे. बंगळुरूमध्ये पार पडलेल्या या स्पर्धेत सुमारे ८ हजार खेळाडूंनी सहभाग घेतला. साक्षीने उत्तुंग कामगिरी करत सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

हायरॉक्स ही एक जागतिक स्तरावरील हायब्रिड एंड्युरन्स रेस असून यात धावणे आणि फंक्शनल फिटनेस यांचा अनोखा संगम असतो. या स्पर्धेत एकूण ८ किलोमीटर धावण्याचा समावेश असून प्रत्येक १ किलोमीटर नंतर एक वेगळे वर्कआउट स्टेशन असतो. स्पर्धेतील टप्पे अत्यंत कठीण असून त्यामध्ये १००० मीटर स्किअर्ग, स्लेड पुश, (१०२ किलो), स्लेड पुल (७८ किलो), ८० मीटर बर्पि ब्रॉड जम्पस, १००० मीटर रोविंग, २०० मीटर फार्मर्स कॅरी , १०० मीटर सॅण्ड बॅग लंजेस, (१० किलो) आणि शेवटी १०० वॉल बॉल्स (४ किलो) यांचा समावेश होता.

साक्षी मनोज छाजेड यांनी या कठीण स्पर्धेत केलेली उत्कृष्ट कामगिरी प्रेरणादायी असून त्यांच्यावर सर्व स्तरातून कौतुकाचा वर्षाव होत आहे. स्काय ब्रिजचे संचालक मनोज छाजेड यांची ती कन्या आहे. या यशाबद्दल तिचे सर्वत्र कौतुक होत आहे.

आनंदतीर्थ येथे अक्षय तृतीयेला उपाध्याय प्रवर

# पपू श्री. प्रवीणऋषीजी म.सा.आदि साधु–साध्वीजींच्या सानिध्यात १३ व्या वर्षितप पारणा महोत्सवाचे आयोजन

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**



**अहिल्यानगर–** राष्ट्रसंत आचार्य पुज्य श्री आनंदऋषी जी म.सा.ची जन्मभुमी असलेल्या अहमदनगर जिल्ह्यातील ''गुरु आनंद तीर्थ'' , चिचोंडी या पवित्र स्थानी भव्य १३वा वर्षितप पारणा महोत्सव – २० एप्रिल २०२६ अक्षय्य तृतीयेला होणार आहे.

दरवर्षीप्रमाणे हजारो गुरुभक्तांच्या उपस्थीत ४०० हुन अधिक वर्षीतप तपस्वींचे पारणे गुरु आनंद तीर्थ'' च्या भव्य प्रांगणात संपन्न होणार आहेत .उपाध्याय प्रवीणऋषीजी म सा च्या श्रीमुखाने तपस्वींची आलोचना व अतियय दिमाखात शाही व्यवस्थेत तपस्वींचे पारणे होणार आहेत.

या प्रसंगी अर्हम् विज्जा प्रणेता, उपाध्याय प्रवर पपू श्री.प्रवीणऋषीजी म.सा.आदि ठाणा २ यांचे सहीत महासती प.पू श्री प्रीतीदर्शनाजी म. सा आदि ठाणा ६ , महासती प.पू.श्री संयमप्रभाजी म सा आदि ठाणा ५ , महासती प.पू.श्री जयश्रीजी म. सा आदि ठाणा ३, महासति प.पू श्री प्रणवदर्शनाजी म. सा आदि ठाणा ४ यांचे मंगल सान्निध्य लाभनार आहे।

देश विदेशातील शेकडों वर्षीतप आराधक तपस्वी या पारणोत्सवात सम्मीलीत होउन गुरूचरणात श्रध्दा भक्ती समर्पित करीत वर्षीतप तपस्येचे शिखर महोत्सव साजरा करतात .

हे दिव्य दृष्य पाहण्यासाठी व तपस्वीना अनुमोदना देण्यासाठी आपण सहपरिवार , श्रीसंघ समवेत सादर आमंत्रित आहात .

या मंगल पारणा महोत्सव गौतमप्रसादीचे पुण्यशाली लाभार्थी श्रीमती ईच्छाबाई इंद्रकुमारजी बोरा आणि समस्त बोरा परीवार पुणे असार आहेत

दिनांक १९ एप्रिल रोजी संध्याकाळी सात वाजता या सर्व तपस्वींच्या अनुमोदनासाठी गुरुभक्ती व अनुमोदना असा कार्यक्रम ठेवण्यात आला आहे या कार्यक्रमासाठी सर्व भाविकजणांनी उपस्थित रहावे

या कार्यक्रम आयोजनाच्या यशस्वीतेसाठी गुरुदेवांच्या मार्गदर्शनाखाली विभिन्न समीतीं द्वारे शेकडो सेवाभावी भाविक यासाठी निरन्तर परिश्रम घेत आहेत.

गुरु आनंद फाउंडेशन च्या वतीने सर्व गुरु भक्तांना सादर आमंत्रण आहेत की तपस्वीना अनुमोदना व बहुमान देण्यासाठी सर्वांनी या कार्यक्रमास उपस्थिती लावावी ,या भव्य वर्षिताप पारण महोत्सवात, तुमच्या संबंधित विभागातील तपस्वींना जोडा आणि त्यांना पारण समारंभात सहभागी होण्यासाठी आमंत्रित करा.

# कंत्राटदारांच्या आंदोलनाला ब्रेक; ९००० कोटींची अतिरिक्त तरतूद, विनाअट मुदतवाढ जाहीर

## साताऱ्यातील बैठकीत मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांचे मोठे निर्णय; राज्यभरातील कामबंद आंदोलन स्थगित

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्रातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कंत्राटदारांनी सुरू केलेल्या कामबंद आंदोलनाला अखेर ब्रेक लागला असून सातारा येथे झालेल्या उच्चस्तरीय बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय जाहीर झाल्यानंतर राज्यभरातील आंदोलन मागे घेण्याचा एकमुखी निर्णय घेण्यात आला आहे.

सार्वजनिक बांधकाम मंत्री मा. ना. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या सातारा येथील निवासस्थानी झालेल्या बैठकीत कंत्राटदारांच्या प्रलंबित देयकांसह विविध मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेण्यात आले. या बैठकीस सार्वजनिक बांधकाम खात्याचे सचिव शरद राजभोज यांच्यासह महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना व महाराष्ट्र राज्य पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनाचे राज्य अध्यक्ष इंजि. मिलिंद भोसले, विभागीय अध्यक्ष अनिल पाटील, विभागीय अध्यक्ष इंजि. समीर अमीन शेख, सुरेश कडु पाटील, प्रकाश पांडव, प्रकाश पालरेचा, मंगेश आवळे, उपाध्यक्ष कांतीलाल डुबल, दिनेश कटारिया, कैलास लांडे, सिकंदर डांगे,



प्रशांत भोसले, पुंजाराम पाटील, नरेंद्र भोसले आदीसह महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ, राज्य अभियंता संघटना व पाणीपुरवठा कंत्राटदार संघटनेचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यातील कंत्राटदारांनी ९ मार्च रोजी कर्जत येथे झालेल्या बैठकीत ३१ मार्चपर्यंत देयके न मिळाल्यास ७ एप्रिलपासून कामबंद आंदोलनाचा इशारा दिला होता. त्यानुसार ७ एप्रिलपासून कामे ठप्प करण्यात आली होती. मात्र शासनाने तातडीने दखल घेत बैठक बोलावली आणि त्यातून मोठे निर्णय जाहीर झाले.बैठकीत राज्यातील प्रलंबित देयकांसाठी १९ हजार कोटींच्या बजेटव्यतिरिक्त आणखी ९ हजार कोटींची अतिरिक्त तरतूद करण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच सध्या सुरू असलेल्या व अपूर्ण कामांना कोणत्याही अटीशिवाय मार्च २०२७ पर्यंत मुदतवाढ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आला.

याशिवाय १.५ कोटींच्या आतील कामांमध्ये ३३ टक्के सुशिक्षित बेरोजगार अभियंते आणि ३४ टक्के ओपन कंत्राटदार यांना कामे देण्याचे आदेश देण्यात येणार आहेत. विविध लेखाशिर्षकांतर्गत नवीन कामांसाठी निधी उपलब्ध करून देण्यासह बिलांचे तत्काळ वितरण करण्याचे निर्देशही देण्यात आले. गेल्या चार वर्षांपासून न बदललेले दर अद्ययावत करण्यासाठी नागपूर येथील मुख्य अभियंता यांच्या अध्यक्षतेखाली तातडीने बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला. तसेच कंत्राटदारांच्या नोंदणी नूतनीकरण प्रक्रियेत शिथिलता आणण्याचेही आश्वासन देण्यात आले.

कंत्राटदारांच्या अडचणी व प्रश्न तत्काळ सोडवण्यासाठी संघटनांनी थेट सचिव व मंत्र्यांकडे मांडावेत, असे निर्देशही देण्यात आले असून निधी वितरणात सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना प्राधान्य देण्याच्या सूचना देण्यात येणार आहेत.

# कृतज्ञता सोहळा: प्राचार्य दिलीप रोंगटे सरांची ३५ वर्षांच्या ज्ञानयज्ञाची सांगता

## वडिलांच्या स्मरणार्थ विद्यालयाला ५० हजारांची देणगी



**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** शिक्षण ही केवळ नोकरी नसून ती एक दीर्घ साधना आहे, हे आपल्या ३५ वर्षांच्या अविरत सेवेतून सिद्ध करणारे माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, शेंडी (भंडारदरा) येथील आदर्श प्राचार्य श्री. दिलीप निवृत्ती रोंगटे सर यांचा सेवापूर्ती गौरव सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. याप्रसंगी रोंगटे सरांनी आपल्या वडिलांच्या स्मृती प्रीत्यर्थ विद्यालयाला ५० हजार रुपयांची देणगी सुपूर्द करून सामाजिक बांधीलकीचा एक नवा आदर्श निर्माण केला आहे.

**वडिलांच्या नावाचा शैक्षणिक वारसा**

आपल्या निवृत्तीच्या क्षणी कृतज्ञता व्यक्त करताना प्राचार्य रोंगटे सर भावूक झाले होते. त्यांनी आपले वडील कै. निवृत्ती रूपा रोंगटे यांच्या स्मरणार्थ ५० हजार रुपयांची रक्कम संस्थेचे अध्यक्ष तथा कार्यक्रमाचे अध्यक्ष सुनील दातीर व सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख यांच्याकडे सुपूर्द केली. या ठेवीतून येणाऱ्या व्याजाच्या रकमेतून दरवर्षी इयत्ता १० वी आणि १२ वी च्या परीक्षेत प्रथम येणाऱ्या गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात येणार आहे. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना अभ्यासात जिद्द निर्माण व्हावी आणि त्यांनी पहिला येण्याची प्रेरणा घ्यावी, हा या देणगीमागील मुख्य उद्देश असल्याचे सरांनी आवर्जून नमूद केले.

**३५ वर्षांचा प्रेरणादायी प्रवास**

कार्यक्रमादरम्यान सरांच्या शैक्षणिक प्रवासाचा गौरव करण्यात आला. अतिदुर्गम आदिवासी भागातील साम्रद येथे जन्मलेल्या रोंगटे सरांनी घाटघर आणि संगमनेर येथून आपले शिक्षण पूर्ण केले. १९९१ मध्ये अंभोळ विद्यालयातून सुरू झालेला हा प्रवास शेंडी विद्यालयाच्या कायापालटापर्यंत येऊन पोहोचला. २००६ पासून प्राचार्य पदाची धुरा सांभाळताना त्यांनी शाळेला भाड्याच्या खोलीतून बाहेर काढून लोकसहभागातून सुसज्ज अशा वर्गखोल्या आणि अत्याधुनिक प्रयोगशाळा मिळवून दिली.

मान्यवरांची उपस्थिती आणि गौरव

या सोहळ्याला राजकीय, शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रातील अनेक दिग्गज उपस्थित होते. संस्थेचे अध्यक्ष मा सुनील दातीर यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाला मा. श्री. दिलीपराव भांगरे, मा. श्रीमती सुनिताताई भांगरे, मा. श्री. अमितदादा भांगरे, सेक्रेटरी सुधाकरराव देशमुख अकोले तालुका एज्युकेशन सोसायटीचे सदस्य सुधाकरराव आरोटे शरदराव देशमुख धनंजय संत उन्नती सेवा मंडळाचे भरत गाणे भंडारदरा मा.सरपंच पांडू शेठ खाडे, जितेंद्र भांगरे, शिक्षक भारती संघटनेचे विभागीय कार्याध्यक्ष महेश पाडेकर माध्यमिक शिक्षक सोसायटीच्या संचालक किशोर धुमाळ,सी. बी.भांगरे, कोंढार सर, भालेराव सर,यशवंत वरे, चंदर बांडे, विठ्ठल भांगरे, सुनील जाधव, प्राचार्य सुनील पंडित, प्राचार्य सुनील धुमाळ, प्राचार्य अभय वाघ, संजय डगळे, प्राचार्य काशिनाथ तळपाडे, रामनाथ आरोटे, अंकुश भोईर, हिरामण झडे,युवराज पाडेकर, सिताराम पाटील, झडे लक्ष्मण, भरत भांगरे,एकनाथ महाराज भांगरे, रोंगटे सरांच्या कुटुंबातील सर्व सदस्य व अनेक क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. सर्वांनीच रोंगटे सरांच्या प्रशासकीय कौशल्याचे आणि सकारात्मक वृत्तीचे कौतुक केले.

**विद्यार्थी आणि सहकाऱ्यांतून कृतज्ञता**

कार्यक्रमाच्या शेवटी, विद्यालयाचे शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, माजी विद्यार्थी आणि ग्रामस्थांच्या वतीने रोंगटे सरांचा यथोचित सत्कार करण्यात आला. ''सरांनी लावलेले हे शैक्षणिक रोपटे आता एका विशाल वटवृक्षाचे रूप धारण करून हजारो विद्यार्थ्यांना सावली देत आहे,'' अशा शब्दांत त्यांच्या कार्याचा गौरव करण्यात आला.

आपल्या निवृत्तीनंतरचे आयुष्य सुख–समाधानाचे आणि आरोग्यदायी जावो, अशा शुभेच्छा उपस्थित सर्व ग्रामस्थ आणि विद्यार्थी

# डॉ. रेशमा रिजवान शेख या सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्ण फॉर्मकॉलॉजी परीक्षेत प्रथम श्रेणीत

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**अहिल्यानगर–** महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक, तर्फे घेण्यात आलेल्या हिवाळी २०२५ च्या सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्ण फॉर्मकॉलॉजी (सि. सि. एम. पी.) या परिक्षेचा निकाल नुकताच लागला असून या परीक्षेत शरदचंद्रजी पवार होमिओपॅथिक मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल श्रीरामपूर च्या फॉरेन्सिक मेडिसिन व टॉक्सीकोलॉजी विभागाच्या गेस्ट प्रोफेसर व गोविंदपुरा येथील इरा क्लिनिक च्या प्रथित यश डॉ. सौ. रेशमा रिजवान अहमद शेख या प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाल्या.



त्या गेल्या २० वर्षा पासून मुकुंदनगर, दर्गादायरा, गोविंदपुरा, फकीरवाडा भागात वैद्यकीय सेवा देत आहेत ते स्त्रियांचे व लहान मुलांच्या आजारांचे उपचार करतात. त्या सि. सि. एम. पी. प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होणाऱ्या या भागातील एकमेव व पहिल्या महिला डॉक्टर आहेत. त्यांनी त्यांचे वैद्यकीय शिक्षण सुद्धा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक येथून घेतले आहेत. त्यांनी एक वर्ष कालावधीचा सर्टिफिकेट कोर्स इन मॉडर्ण फॉर्मकॉलॉजी कोर्स अहिल्यानगर येथील प्रसिद्ध डॉ. विठ्ठलराव विखे पाटील फॉन्डेशन च्या मेडिकल कॉलेज व हॉस्पिटल विळद घाट, अहिल्यानगर येथे पूर्ण केला. सदर सि. सि. एम. पी. कोर्स महाराष्ट्र राज्य सरकारने खास अॅलोपॅथी शास्त्राची प्रॅक्टिस करण्यासाठी सुरु केलेला आहे व तो कोर्स पूर्ण करणाऱ्या डॉक्टरचा महाराष्ट्र मेडिकल कॉन्सीलच्या यादीमध्ये समाविष्ट करण्यात येणार आहे.

त्यांच्या या यशाबद्दल डॉ. विठ्ठल राव विखे पाटील मेडिकल कॉलेजचे डिन डॉ. सुनील म्हस्के फॉर्मकॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. किरण वाकडे, मा. आ. सुधीर तांबे, आ. सत्यजित तांबे मा. नगराध्यक्ष सौ. दुर्गाताई तांबे, नगराध्यक्ष सौ. मिताली तांबे, शिवा ट्रस्ट संभाजीनगर चे अध्यक्ष डॉ. बाळासाहेब पवार, संचालक मा सभापती श्री. दिलीप दादा पवार, प्रशासकीय अधिकारी श्री. श्रीकांत पवार, साईदीप हॉस्पिटलचे डॉ. आर. आर. धूत, डॉ. राहुल धूत, मा जिल्हा समाज कल्याण अधिकारी रफिक मुंशी, डॉ. भूषण अनभुले डॉ. सी.बी. कुलकर्णी, डॉ. सौ गौरी कुलकर्णी, डॉ. सुहास घुले, दो. धनंजय वाघ, डॉ. पोपट करडिले, डॉ. एम. के. शेख, डॉ. श्रीकांत गांधी, डॉ. सुनील पवार, डॉ. शकील सय्यद, डॉ. शरद डुबे, डॉ. अजय देशमुख डॉ. श्री. व सौ. कर्डे, डॉ. अमोल जाधव इत्यादींनी अभिनंदन केले.

# पैठणमध्ये अनोळखी पुरुषाचा मृत्यू; रुग्णालयात आणताच 'डेड' घोषित

## ओळख अद्याप अस्पष्ट; पोलिसांकडून शोधमोहीम सुरू

**दैनिक आकर्षण । प्रतिनिधी**

**पैठण–** शहरातील सरकारी दवाखान्यात एका अनोळखी पुरुषाचा मृत्यू झाल्याची घटना सोमवारी (दि. १२) सायंकाळी उघडकीस आली. संबंधित व्यक्तीस मयत अवस्थेतच रुग्णालयात आणण्यात आल्याने डॉक्टरांनी तपासून त्यास मृत घोषित केले. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, या प्रकरणी अकस्मात मृत्यू () क्र. २६/२०२६, कलम १९४ अंतर्गत नोंद करण्यात आली आहे. मृत व्यक्तीचे वय अंदाजे ३५ ते ४५ वर्षांदरम्यान असून, त्याची ओळख अद्याप पटलेली नाही. सरकारी दवाखान्याच्या वैद्यकीय अधिकाऱ्यांनी दिलेल्या अहवालानुसार, दि. १२ एप्रिल रोजी सायंकाळी ७.५० वाजता संबंधित व्यक्तीस दाखल करण्यात आले. तपासणीअंती त्याचा मृत्यू झाल्याचे निष्पन्न झाले. ही घटना पोलीस ठाण्यापासून सुमारे २ किमी अंतरावर दक्षिण दिशेस घडल्याची माहिती असून, पुढील तपास पोहेका जिवडे करीत आहेत. दरम्यान, पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, संबंधित वर्णनाशी मिळतीजुळती व्यक्ती हरवलेली असल्यास तातडीने पैठण पोलीस ठाण्याशी संपर्क साधावा.

(पान १ वरून)

### नवीन रस्त्यांवर गॅस पाईपलाईन कंपनीकडून खोदकाम; नागरिकांमध्ये संताप

असले रस्ता काँक्रिटीकरणाचे कामे भविष्यात गॅस पाईपलाईन कंपनीकडून खोदली जाऊ शकतात यासाठी.महापालिकेने नव्याने तयार झालेल्या रस्त्यांचे संरक्षण करण्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात. तसेच गॅस पाईपलाईनसारखी कामे नियोजनबद्ध पद्धतीने करून नागरिकांना त्रास होणार नाही, याची खबरदारी घेणे गरजेचे आहे. अन्यथा अशा प्रकारे नव्या रस्त्यांवर पुन्हा पुन्हा खड्डे खोदले जाणार असल्याची भीती नागरिकांनी व्यक्त केली आहे.

### सराईतांच्या टोळीकडून १२ मोटारसायकली हस्तगत

दिनांक ८ मार्च रोजी फिर्यादी दत्तात्रय भागवत म्हस्के (वय २८, रा. रेणुकाईवाडी ता. पाथर्डी) यांची दुचाकी (एमएच १६ सीएल१३६५) ही चोरी झाली होती. याबाबत पाथर्डी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल आहे.दुचाकीचोरीच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर एलसीबीचे पथक दिनांक १२ रोजी आरोपींची माहिती काढत असताना पथकास गोपनीय माहिती मिळाली की, सदर दुचाकी रेकॉर्डवरील आरोपी महेश कांदळकर (रा. अशोकनगर ता. श्रीरामपूर) याने साथीदारांसह चोरली असून, दुचाकी विक्रीसाठी ते श्रीरामपूर येथे येणार आहेत. त्यानुसार पथकाने अशोकनगर ते मातापूर रोडवरील रेल्वे पुलाखाली सापळा रचून दोन दुचाकींवर आलेल्या चारजणांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडील दोन्ही दुचाकी चोरीच्या असल्याचे उघड झाले. चौकशीत त्यांनी मढी यात्रेतून तसेच देहरे टोलनाका, कौठे कमळेश्वर (ता. संगमनेर) येथून १० दुचाकी चोरल्या असून, त्या लपवून ठेवल्याचे सांगितले.

आरोपींच्या ताब्यातून एकूण तीन लाख २९ हजार रुपये किमतीच्या बारा दुचाकी तसेच ३४ हजारांचे पाच मोबाईल असा एकूण ३ लाख ५३ हजार १०० रुपये किमतीचा मुद्देमाल हस्तगत केले आहे. या टोळीच्या अटकेने सात गुन्हे उघडकीस आले आहेत.

**जागा भाड्याने देणे आहे**

**पारनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित सुपा, ता.पारनेर, जि. अहिल्यानगर.**

पारनेर तालुका सहकारी दूध उत्पादक व प्रक्रिया संघ मर्यादित सुपा, ता.पारनेर, जि. अहिल्यानगर. यांच्या मालकीची सुपा येथील गट नंबर २८७/२ मधील १० गुंठे जागा भाड्याने देणे आहे तरी इच्छुकांनी दूध संघाच्या कार्यालयाशी संपर्क साधावा त्याबाबतचे सर्व नियम व अटी संघाच्या कार्यालयात पहावयास मिळतील.

**पत्ता: सुपा, ता.पारनेर,जि. अहिल्यानगर.**

**अर्ज करण्याची अंतिम तारीख:** २५/०४/२०२६

या बाबतचे सर्व अंतिम अधिकार संचालक मंडळाकडे राखीव असतील.

**अध्यक्ष, उपाध्यक्ष, तथा कार्यकारी संचालक व सर्व संचालक मंडळ**

**संपर्क:** ९४२३०५८४५८/ ९७६३४५३५०५/ ७४४८३८३०३०